# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पुर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक क्रमांक ८० /२०२१**

सदर परिपत्रकाद्वारे विद्यापीठातील विविध विभागातील सर्व संबंधित शिक्षकांना कळविण्यात येते की, जे शिक्षक दि.०१.०१.२०१६ ते दि.३१.१२.२०१८ या कालावधीमध्ये सेवानिवृत्त/स्वेच्छानिवृत्त झाले आहेत आणि सहाव्या वेतन आयोगानुसार मूळ सेवानिवृत्ती वेतनावर अंशराशीकरणाचा लाभ घेतलेला आहे, अशा शिक्षकांना सातव्या वेतन आयोगानुसार सुधारीत होणाऱ्या मूळ निवृत्तीवेतनावर सुधारीत अंशराशीकरणाचा लाभ शासन निर्णय क्रमांक सेनिवे-२०१९/प्र.क्र.३४८/सेवा-४ दि. ०५/०२/२०२१ नुसार देय करण्यात आलेला आहे.

विद्यापीठातील विविध विभागातील उपरोक्त कालावधीमध्ये सेवानिवृत्त/स्वेच्छानिवृत्त झालेल्या शिक्षकांना कळविण्यात येते की, ज्या शिक्षकांना सुधारीत अंशराशीकरणाचा लाभ घ्यावयाचा असेल अशा शिक्षकांनी या परिपत्रकासोबत जोडलेला विकल्प आणि आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची पूर्तता करावी. सदरचा विकल्प आणि कागदपत्रे संबंधित प्रशासन विभागात मंगळवार, दि.२३/०३/२०२१ पर्यंत सादर करण्यात यावीत. या मुदतीमध्ये जे सेवक विकल्प सादर करणार नाहीत त्यांना सातव्या वेतन आयोगानुसार मूळ निवृत्तीवेतनावर सुधारीत अंशराशीकरणाचा लाभ घ्यायचा नाही असे समजण्यात येईल. तसेच कुटुंब निवृत्तीवेतन धारकानां अंशराशीकरणाचा लाभ देय होत नाही.

दि.०१.०१.२०१६ ते दि.३१.१२.२०१८ या कालावधीमध्ये सेवानिवृत्त/स्वेच्छानिवृत्त झालेल्या सर्व संबंधित शिक्षकांनी उपरोक्त बाबींची योग्य ती नोंद घ्यावी.

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७. )
जा.क्र. : एटी/३३४ )
दिनांक : 93/03/2021 )

(डॉ.प्रफुल्ल अ. पवार)
**कुलसचिव**

**सोबत :** वरीलप्रमाणे

**प्रत माहितीसाठी व योग्यत्या कार्यवाहीसाठी :**

१. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग यांना विनंती की, सदरच्या परिपत्रकाचा आशय सर्व संबंधित शिक्षकांच्या निदर्शनास आणून द्यावा.

# सातव्या वेतन आयोगानुसार सुधारीत होणाऱ्या मूळ निवृत्तीवेतनावर सुधारीत अंशराशीकरणाचा लाभ मिळण्यासाठीचा विकल्प

**संदर्भ :- १. शासन निर्णय क्रमांक : सेनिवे-२०१९/प्र.क्र.३४८/सेवा-४, दि. ०५ फेब्रुवारी, २०२१**

१. अ) कर्मचा-याचे नाव :

ब) कार्यालयाचे नाव :

क) धारण केलेले पद :

ड) जन्म दिनांक :

इ) नेमणूकीचा दिनांक :

ई) सेवानिवृत्तीचा दिनांक :

२. मी श्री./श्रीमती

पदनाम यांव्दारे

अ) सातव्या वेतन आयोगानुसार सुधारीत होणाऱ्या मूळ निवृत्तीवेतनावर सुधारीत अंशराशीकरण न करता सुधारीत मूळ निवृत्तीवेतन वजा यापूर्वी असुधारीत निवृत्तीवेतनावर अंशराशीकरण केलेली रक्कम एवढे निवृत्तीवेतन घेणे यांची मी निवड करतो.

ब) सातव्या वेतन आयोगानुसार सुधारीत होणाऱ्या मूळ निवृत्तीवेतनापैकी (सुधारीत मूळ निवृत्तीवेतन वजा पूर्वीचे मूळ निवृत्तीवेतन) पुन्हा ४०% रक्कमेचे अंशराशीकरण तक्त्यामध्ये निश्चित केलेल्या दरानुसार करणे याची मी निवड करतो.

३. हा विकल्प अंतिम असून त्यामध्ये आजच्या तारखेनंतर सुधारणा करण्यात येणार नाही.

सेवकाची सही

स्थळ : सेवकाचे नाव :

दिनांक : पदनाम :

कार्यालय प्रमुखांची स्वाक्षरी:

कार्यालयाचा शिक्का :

**(टिप : उपरोक्त मुद्दा क्रमांक २. मधील अ किंवा ब या दोन्हीपैकी एक विकल्पाची निवड करावी. निवड केलेला विकल्पामध्ये भविष्यात सुधारणा करता येणार नाही.)**

**सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार दिनांक १ जानेवारी २०१६ ते ३१ डिसेंबर २०१८ या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तिवेतनधारकांना निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणाचा सुधारीत लाभ देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : सेनिवे-२०१९/प्र.क्र.३४८/सेवा-४**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ०५ फेब्रुवारी, २०२१.

**संदर्भ :** शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : सेनिवे-२०१९/प्र.क्र.५८/सेवा-४, दि.०१.०३.२०१९.

**प्रस्तावना-**

दि.१ जानेवारी २०१६ नंतर सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तिवेतनधारकाचे निवृत्तिवेतन / कुटुंब निवृत्तिवेतन सुधारीत करण्याबाबतचे आदेश संदर्भाधीन दि.१.३.२०१९ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आले आहेत. तथापि, दि.१.१.२०१६ ते दि.३१.१२.२०१८ या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगानुसार सुधारीत होणाऱ्या मूळ निवृत्तिवेतनावर सुधारीत अंशराशीकरणाचा लाभ देण्यात आलेला नव्हता. सदर सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगानुसार सुधारीत होणाऱ्या मूळ निवृत्तिवेतनावर सुधारीत अंशराशीकरणाचा लाभ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय-**

या प्रकरणी शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, जे कर्मचारी दिनांक १ जानेवारी २०१६ ते दिनांक ३१ डिसेंबर २०१८ या कालावधीमध्ये सेवानिवृत्त झाले आहेत, आणि यापूर्वी सहाव्या वेतन आयोगानुसार मूळ निवृत्तिवेतनावर अंशराशीकरणाचा लाभ घेतलेला आहे, त्यांना सातव्या वेतन आयोगानुसार सुधारीत होणाऱ्या मूळ निवृत्तिवेतनावर सुधारीत अंशराशीकरणाचा लाभ देय करण्यात येत आहे. विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांनी दि.१.१.२०१६ ते दि.३१.१२.२०१८ दरम्यान सेवानिवृत्त झालेल्या व यापूर्वी ६ व्या वेतन आयोगानुसार मूळ निवृत्तिवेतनावर अंशराशीकरणाचा लाभ घेतलेल्या निवृत्तिवेतनधारकांना, ७ व्या वेतन आयोगानुसार मूळ निवृत्तिवेतनावर आधारीत फरकाच्या रकमेवर, अंशराशीकरणाचा लाभ देण्याबाबत उचित कार्यवाही करावी.

२. ज्यांना निवृत्तिवेतन योजना लागू केलेली आहे अशा मान्यता व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्था, कृषित्तर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्न असलेली अशासकीय महाविद्यालये आणि कृषि विद्यापीठे यामधील निवृत्तिवेतनधारक यांना वरील निर्णय योग्य त्या फेरफारांसह लागू राहील.

३. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१ (सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक पाच) च्या कलम २४८ च्या परंतुकान्वये प्रदान केलेले अधिकार आणि त्यासंबंधीचे इतर सर्व अधिकार

यांचा वापर करुन शासन असाही आदेश देत आहे की, वरील निर्णय जिल्हा परिषदांचे निवृत्तिवेतनधारक यांनाही लागू राहील.

४. सदर शासन निर्णयातील तरतुदी अखिल भारतीय सेवेतील निवृत्तिवेतनधारक / राजकीय निवृत्तिवेतनधारक / स्वातंत्र्य सैनिक निवृत्तिवेतनधारक / शौर्यपदकभत्ता निवृत्तिवेतनधारक / जखम अथवा इजा निवृत्तिवेतनधारक यांना लागू होणार नाहीत.

५. यासंबंधीचा खर्च वर नमूद निवृत्तिवेतनधारकांचे निवृत्तिवेतन ज्या अर्थसंकल्पीय लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात येतो त्या शीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो त्या त्या शीर्षांतर्गत मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. तथापि आवश्यक असल्यास संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी वरील निवृत्तिवेतनधारकासंबंधीचा खर्च भागविण्यासाठी विधीमंडळाच्या येत्या अधिवेशनात पूरक मागणी सादर करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी.

६. दिनांक १ मार्च २०१९ च्या शासन निर्णयातील संबंधित तरतूदी आवश्यक तेथे लागू राहतील.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक २०२१०२०५१५३१५१३८०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णयाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

INDRAJEET SAMBHAJI GORE

Digitally signed by INDRAJEET SAMBHAJI GORE
DN: CN = INDRAJEET SAMBHAJI GORE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = FINANCE DEPARTMENT
Date: 2021.02.05 15:44:37 +05'30'

**( इंद्रजित गोरे )**
**शासनाचे उप सचिव.**

**प्रति,**

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई,
२) महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर,
३) महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई,
४) महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर,
५) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
६) अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे, मुंबई,
७) संचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई,
८) संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, कोकण भवन, नवी मुंबई.
९) सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, कोकण / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.
१०) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
११) सर्व कोषागार अधिकारी,
१२) सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई

१३) मा.राज्यपाल यांचे सचिव,
१४) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
१५) मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
१६) सर्व मंत्री व राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव,
१७) विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
१८) प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ न्याय शाखा) मुंबई,
१९) प्रबंधक, उच्च न्यायालय, (अपील शाखा),मुंबई,
२०) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
२१) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
२२) प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
२३) प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण मुंबई/नागपूर/औरंगाबाद
२४) मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, मुंबई.
२५) आयुक्त, राज्य माहिती आयोग (सर्व)
२६) सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, १ला मजला, मंत्रालयासमोर, मुंबई ४०००३२
२७) सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य महिला आयोग,गृहनिर्माण भवन (म्हाडा बिल्डींग), पोट माळा, वांद्रे पूर्व, मुंबई ४०० ०५१.
२८) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई - ४०००३२.
२९) मंत्रालयातील सर्व विभाग,
३०) मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख,
३१) सर्व विभागीय आयुक्त,
३२) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
३३) सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष
३४) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
३५) संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे,
३६) संचालक (तंत्र शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मुंबई,
३७) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
३८) संचालक, महानगरपालिका प्रशासन, मुंबई,
३९) कुल सचिव, सर्व कृषि व कृषितर विद्यापीठे,
४०) बहुजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई ४००००१
४१) भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरॅक नं. १, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट , मुंबई ४०००२०
४२) भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभुवन, एस.व्ही.पटेल रोड,, मुंबई ४००००४
४३) भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई ४०००१३
४४) इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई ४०००२५
४५) नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई ४०००२१
४६) शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई ४०००२८
४७) वित्त विभागातील सर्व कार्यासने,
४८) निवड नस्ती, कार्यासन सेवा-४.

To give the benefit of revised Commutatio of Pension as per Seventh Pay Commission to the pensioners who retired from service between 1st January 2016 to 31st December 2018.

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**Finance Department**
**Government Resolution No. : PEN- 2019/C.R.348/SER-4**
Hutatma Rajguru Chowk, Madam Cama Marg,
Mantralaya, Mumbai- 400 032.
Date : 05 February, 2021.

**Reference:** Government Resolution, Finance Department No. PEN-2019/C.R.58/ SER-4 dated 01/03/2019.

**Preface**:

The decision to revise the pension / family pension of pensioners who retired after 1st January 2016, as per the recommendations of Seventh Pay Commission, has been taken according to Government Resolution dated 01.03.2019. However, the benefit of revision of Commutation of Pension according to Seventh Pay Commission was not made applicable to the employees who have retired from the service between 1st January 2016 to 31st December 2018. In this regard, the issue of making applicable the benefit of revision of Commutation of Pension to the retired employees in the said period was under consideration of the State Government.

**Government Resolution :**

Government is now pleased to decide, that the employees who retired in between 1st January 2016 and 31st December 2018 and who have availed the benefit of commutation on their basic pension as per Sixth Pay Commission, shall be entitled to get the benefit of revised Commutation of Pension in accordance with the revised pension under Seventh Pay Commission. Head of Department / Head of Office to take necessary action to pay difference amount of commutation between Sixth Pay Pension and Seventh Pay Pension to the pensioner who have been given earlier commutation benefit on basic pension of Sixth Pay Commission.

2. The above decision should mutatis mutandis apply with necessary changes to those pensioners of Recognized and Aided Educational Institutions, Non Agriculture Universities and affiliated Non-Governmental Colleges and Agricultural Universities, etc. to whom pension scheme is made applicable.

3. In exercise of the powers conferred by the proviso under Section 248 of Maharashtra Zilla Parishad and Panchayat Samitis Act of 1961 (Maharashtra Act number Five of 1962) and of all other powers enabling it on that behalf, Government is further pleased to decide that above decision shall be applied to the pensioners including family pensioners of Zilla Parishads.

4. The Provisions of this Government Resolution shall not be applicable to Pensioners of All India Services / Political Pensioners / Freedom Fighter Pensioners / Gallantry Medal Allowance Pensioners / Wound / Injury Pensioners.

5. The expenditure on this account shall be debited to the Budget Heads to which the pensions of the pensioners mentioned in the above paras are debited and shall be met from the grants sanctioned thereunder. However, if necessary, concerned Administrative Department of Mantralaya shall take necessary steps to present Supplementary Demands in the ensuing session of the Legislature to cover expenditure to be incurred in respect of aforesaid pensioners.

6. Other relevant provisions of the Government Resolution dated 01.03.2019 shall be applicable where required.

7. This Government Resolution is available on the website of Government of Maharashtra i.e. www.maharashtra.gov.in and its computer code number is 202102051531513805. This order has been signed digitally.

By order and in the name of Governor of Maharashtra.

INDRAJEET SAMBHAJI GORE

Digitally signed by INDRAJEET SAMBHAJI GORE
DN: CN = INDRAJEET SAMBHAJI GORE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = FINANCE DEPARTMENT
Date: 2021.02.05 15:44:59 +05'30'

**( Indrajeet Gore )**
**Deputy Secretary to Government.**